यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)
'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- ४२२२२२
दूरध्वनी : कार्यालय (०२५३) २२३१७१४/१५, २२३०२२७, २२३०४५९
२२३००२४/२५/२७/२८

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan
Maharashtra Open University
(NAAC Accredited 'A' Grade)
'Dnyangangotri', Near Gangapur Dam, Goverdhan, Nashik - 422 222
Phone : Office (0253) 2231714 / 15, 2230227, 2230459
2230024 / 25 / 27 / 28

जा.क्र. :यचममुवि/मानव्य/२०२६ /२०८ दिनांक : २४/०७/२०२६

विषय: महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या Bachelor of Library and Information Science (B.Lib.&I.Sc.) शिक्षणक्रमाबाबत माहिती.

संदर्भ: Grievance Token "DEP/H&TE/YAVT/2026/10", 20 July 2026

संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) दूरशिक्षण मंडळ यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व मान्यतेने Bachelor of Library and Information Science (B.Lib.& I.Sc.) हा एक वर्ष कालावधीचा शिक्षणक्रम राबविण्यात येतो.

१. B.Lib.&I.Sc. व ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांच्यातील शैक्षणिक स्तर व विषयांची तुलना करून संबंध स्पष्ट करणे.

संबंधित अभ्यासक्रमांच्या तुलनात्मक परीक्षणावरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र शासनाचा ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा सहा महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा B.Lib.&I.Sc. हा एक वर्ष कालावधीचा पदवी स्तरावरील शिक्षणक्रम आहे. महाराष्ट्र शासनाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची प्रवेश पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण असणे अशी आहे तर B.Lib.&I.Sc. शिक्षणक्रमासाठी कोणत्याही शाखेची पदवी ही प्रवेशपात्रता असून सदर पदवी अभ्यासक्रमात ग्रंथालय आणि समाज, ग्रंथालय वर्गीकरण, सूचीकरण, संदर्भ सेवा, माहिती सेवा, माहिती तंत्रज्ञान, ग्रंथालय व्यवस्थापन, डिजिटल ग्रंथालय, संशोधनाची मूलतत्त्वे इत्यादी विषयांच्या अधिक व्यापक व सखोल अभ्यासाचा समावेश आहे. त्यामुळे शैक्षणिक स्तर, प्रवेशपात्रता, कालावधी व अभ्यासक्रमाची व्याप्ती या दृष्टीने B.Lib.&I.Sc. शिक्षणक्रम हा ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमापेक्षा उच्च स्तरावरील असल्याचे स्पष्ट होते.

२. B.Lib.&I.Sc. पात्रता संबंधित ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमापेक्षा उच्च म्हणून मान्य करता येते का?

B.Lib.&I.Sc. हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने व नियमांनुसार राबविण्यात येणारा पदवी स्तरावरील शिक्षणक्रम असून त्यासाठी प्रवेशपात्रता पदवी उत्तीर्ण आवश्यक आहे. त्यामुळे शैक्षणिक स्तराच्या दृष्टीने B.Lib.&I.Sc. ही पात्रता ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमापेक्षा उच्च स्तरावरील आहे, असे प्रमाणित करण्यात येते.

३. ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम व B.Lib.&I.Sc. यांच्यात समकक्षता मान्य करता येते का?

B.Lib.&I.Sc. हा एक वर्षाचा शिक्षणक्रम उच्च स्तरावरील असल्याने सहा महिन्याचा प्रमाणपत्र आणि एक वर्षाचा पदवी शिक्षणक्रम समकक्ष आहेत असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. तसेच वरील दोन शिक्षणक्रमांमधील समकक्षता (Equivalence) घोषित करणे अथवा मान्य करणे हे शासन आणि संबंधित विद्यापीठ यांच्या अधिकारकक्षेत येते. त्यामुळे केवळ विद्यापीठाकडून हे दोन्ही शिक्षणक्रम समकक्ष असल्याचे अथवा नसल्याचे

प्रमाणित करता येणार नाही. समकक्षतेबाबतचा निर्णय शासन आणि संबंधित विद्यापीठातील समकक्षता प्राधिकरणाद्वारे होणे अपेक्षित आहे.

४. शासकीय भरती प्रक्रियेत ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाऐवजी B.Lib.&I.Sc. पात्रता ग्राह्य धरता येईल का?

शासकीय भरती प्रक्रियेमध्ये कोणती शैक्षणिक पात्रता ग्राह्य धरावयाची याबाबतचा निर्णय संबंधित विभागाचे भरती नियम, सेवा नियम व नियुक्ती प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातील विषय आहे. मात्र, उमेदवार निवडीतील गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने किमान पात्रता धारक उमेदवार निवडण्यापेक्षा उपलब्ध उमेदवारांतून उच्च स्तरावरील शैक्षणिक पात्रता (पदवी) धारक उमेदवार निवडणे अधिक योग्य होईल.

५. यासंदर्भात विद्यापीठाने यापूर्वी कोणतेही मार्गदर्शन, सूचना किंवा निर्णय जारी केले असल्यास त्याची प्रत.

या विषयासंदर्भात विद्यापीठाने यापूर्वी कोणतेही स्वतंत्र मार्गदर्शन, सूचना अथवा निर्णय जारी केलेला नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगा दारोदारी
नाशिक-४२२ २२२

(डॉ. गोविंद कतलाकुटे)
कुलसचिव (प्र.)